**प्रेस नोट** दिनांक २२/०७/२०१९

**पार्किंग मधुन दुचाकी मोटर सायकल चोरुन घरफोडी करणारा रेकॉर्ड वरील गुन्हेगारास गुन्हे शाखा, युनिट – ४ ने अटक करुन ३,२५,०००/- रुपयेचा मुद्देमाल केला हस्तगत.**

---

पुणे शहरात घरफोडीचे प्रमाणात वाढ झालेली होती. त्या अनुषंगाने मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. अशोक मोराळे, मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री. बच्चन सिंह, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे -२, श्री. भानुप्रताप बर्गे यांनी अशा प्रकारचे गुन्हे करणारे आरोपीच्या कार्यप्रणाली बाबत माहीती घेवुन त्यास शोधणे बाबत मार्गदर्शन केले होते.

वरिष्ठांनी केले मार्गदर्शनाचे अनुषंगाने गुन्हे शाखा युनिट ४ कडुन गुन्हेगाराचा शोध चालु असताना पोलीस उप निरीक्षक निलेशकुमार महाडीक व पोहवा/१७४६ राजु मचे यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की घरफोडीच्या रेकार्डवरील गुन्हेगार रोहीत लंके रा. विश्रांतवाडी, पुणे याने सुमारे पाच दिवसापुर्वी स्वारगेट परिसरातुन सुरेखा कम्युनिकेशन प्रा.लि. मराठा चेंबर्स शेजारी पार्किंग मधुन हिरो होण्डा स्प्लेण्डर गाडी चोरुन गणेश खिंड रोड, औंध, पुणे येथे घरफोडी केलेली आहे अशी बातमी मिळाली. त्या आरोपीचा शोध घेत असता मिळालेल्या सी.सी.टि.व्ही.फुटेज वरुन खात्री करुन रेकॉर्ड वरील **आरोपी नामे रोहीत नानासाहेब लंके वय २० वर्षे रा. कस्तुबा हौ. सोसा., अनिरुध्द अपार्टमेन्ट विश्रांतवाडी, पुणे** यास विश्रांतवाडी भागात सापळा रचुन दिनांक २०/०७/२०१९ रोजी ताब्यात घेतले. सदरचा आरोपी हा विधीसंघर्षीत असल्यापासुन घर फोडीचे गुन्हे करित आसुन तो चोरी केलेला माल हा त्याचे आई वडीलांकडे देत असे, घर फोडीच्या गुन्हया मध्येच त्याचे आई वडील गेले दोन वर्षा पासुन येरवडा जेल येथे आहेत. तो गर्दच्या नशा करुन नशेत घरफोडीचे गुन्हे करतो. त्याची नशा सोडण्याकरिता वेळोवेळी त्याला समउपदेशन करण्यात आले असुनही त्याचे वर्तनात कोणताही बदल झालेला नाही. दि. १५/०७/२०१९ रोजी स्वारगेट परिसरातुन एक स्प्लेण्डर गाडी चोरुन अंगात रेनकोट घालुन औंध, पुणे येथे दोन फ्लॅट फोडुन चोरी केलेली होती तेथील प्राप्त सी.सी.टि.व्ही. फुटेज वरुन त्यास ताब्यात घेऊन त्याचे कडुन **चतुश्रुंगी पो.स्टे. गुरनं.६४६/२०१९ भा.द.वि. कलम** ४५४,३८० या गुन्हयातील चोरीस गेलेले **१२० ग्रॅम सोन्याचे दागिने** तसेच **स्वारगेट पो.स्टे. गुरनं. ३२५/२०१९ भादवि.क. ३७९** या गुन्हयातील सदर घरफोडी करण्यासाठी वापरलेली एक हिरो होण्डा स्प्लेण्डर मोटार सायकल क्र. एम.एच. १२ बी.सी. १९२९ हि जप्त करुन असा **एकुण ३,२५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त** करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. अशोक मोराळे, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री. बच्चन सिंह, मा.सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-२, श्री. भानुप्रताप बर्गे, पोलीस निरीक्षक,युनिट -४, गुन्हे शाखा,श्री.अंजुम बागवान याचे मार्गदर्शनाखाली व पो.उप निरी. निलेशकुमार महाडीक, कर्मचारी राजु मचे, शंकर पाटील, गणेश साळुंके, दत्तात्रय फुलसुंदर, गणेश काळे, विशाल शिर्के व राकेश खुनवे यांनी केलेली आहे.